Listening Passages

# आपला मेंदू

आपला मेंदू हा एक महासंगणक आहे. तो आपण जितका वापरू तितका अधिक काम करू लागतो. जेव्हा तुम्ही काहीतरी नवीन शिकता तेव्हा मेंदूतील रक्तप्रवाह वाढतो, तो उत्तेजित होतो आणि जास्त काम करू लागतो. खूप काळ तुम्ही काहीच नवीन शिकत नसाल तर मेंदूतील काही भाग काम करेनासा होतो. मग आठवणे आणि शिकणे दोन्ही कठीण होते. आईन्स्टाईन म्हणाले होते की एखादी व्यक्ती वर्षभर एखाद्या विषयाचा एकाग्रतेने अभ्यास करील तर ती त्यातली तज्ज्ञ होऊ शकते. त्यामुळे शिकणे ही क्रिया मेंदूच्या आरोग्यासाठी उत्तमच आहे.

प्रश्न:

१. माणसाचा मेंदू कसा आहे?

२. आपण जेव्हा नवीन शिकतो तेव्हा काय होते?

३. आपण खूप काळ काहीच नवीन शिकलो नाही तर काय होईल?

४. आईन्स्टाईनचे मेंदू बद्दल काय मत होते?

५. मेंदूच्या आरोग्यासाठी तुम्हाला काय नवीन शिकायला आवडेल ?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening Passages

# भास्कराचार्य

बाराव्या शतकात भारतात भास्कराचार्य नावाचे एक गणितज्ञ होते. त्यांनी संस्कृत भाषेत गणितावर आधारित चार ग्रंथ लिहिले. त्यातील एकाचे नाव लीलावती आहे. या ग्रंथात गणितासंबंधी कोडी आहेत. ही कोडी संस्कृत भाषेत आहेत. त्यांचा खगोलशास्त्राचाही अभ्यास होता. आकाशातील ग्रह कसे फिरतात, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण कसे होते यांचाही अभ्यास त्यांनी केला होता. पृथ्वीला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यास ३६५ दिवस लागतात हे त्यांनी सिद्ध केले. त्यांचे संशोधन आजही स्वीकारले जाते.

प्रश्न:

१. भास्कराचार्य कोण होते?

२. त्यांनी कोणत्या भाषेत आणि कोणत्या विषयावर ग्रंथ लिहिले?

३. त्यातील एका ग्रंथाचे नाव काय होते?

४. भास्कराचार्य अजून कोणत्या विषयांचा अभ्यास करत असत?

५. त्यांनी काय काय सिद्ध केले होते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Passages

# बोरा बोरा- वैटापे

पॉलिनेशिया हा पॅसिफिक महासागरातील एक भौगोलिक प्रदेश आहे. पॉलिनेशियामध्ये एकुण १,००० पेक्षा जास्त बेटं आहेत. यातील फ्रेंच पॉलिनेशिया हा बेटांचा गट फ्रान्स देशाचा एक भाग आहे. ताहिती हे फ्रेंच पॉलिनेशियातले सर्वात मोठे व सर्वाधिक लोकसंख्येचे बेट आहे. तसेच, बोरा बोरा आणि वैटापे ही बेटं आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळे आहेत. या बेटांची अर्थव्यवस्था संपूर्णपणे पर्यटनावर चालते. येथील ओव्हर-वॉटर बंगले हे मोठे वैशिष्ट्य आहे. हे बंगले स्वस्त ते अगदी महाग असे भाड्याने मिळतात. बेटावर सार्वजनिक वाहतूक नाही.  भाड्याने घेतलेल्या मोटारी आणि सायकली ही वाहतुकीची साधने आहेत. या व्यतिरिक्त, वैटापे मध्ये दोन आसनी बग्गी आणि मोटर बोट भाड्याने घेता येतात. बोरा बोराच्या कालव्यात स्नॉर्कलिंग आणि स्कूबा डायव्हिंग लोकप्रिय आहेत.

प्रश्न:

१. पॉलिनेशियामध्ये एकुण किती बेटं आहेत?

२. बेटांच्या एका गटाला फ्रेंच पॉलीनेशिया असं का म्हणतात?

३. बोरा बोरा आणि वैटापे ही बेटं कशासाठी ओळखली जातात?

४. बोरा बोरा आणि वैटापे येथील बंगले कसे आहेत?

५. या बेटांवर कोणती वाहतुकीची साधने आहेत?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Reading Passages

# थॉमस एडीसन

आज आपण इंटरनेट, टीव्ही आणि मोबाईलच्या युगात छान रमलो आहोत. जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात घडलेली घटना आपल्यासमोर काही क्षणात येते. त्याआधी आपण रेडिओवरून बातम्या ऐकत होतो. रेडिओच्या आधी ग्रामोफोन होता. एका तबकडीत आवाज साठवून तो केव्हाही ऐकण्याची सोय त्यात होती. हा ग्रामोफोन शोधून काढणारा संशोधक म्हणजे थॉमस एडिसन. आपल्या प्रयोगशाळेत तो सतत काम करीत असे. एकदा त्याची बायको त्याला म्हणाली,

" कामातून थोडी तरी विश्रांती घ्या. तुमच्या मनाला वाटेल तिकडे जा" एडिसन म्हणाला, "मला प्रयोगशाळेतच जावेसे वाटते आहे."

प्रश्न:

१. जगाच्या कोपऱ्यात घडलेली एखादी घटना आपल्यासमोर काही क्षणात कशी येते?

२. पूर्वी आपण बातम्या कशा ऐकायचो?

३. रेडिओच्या आधी कोणते यंत्र होते आणि कसे होते?

४. थॉमस एडिसन कोण होता?

५. जर इंटरनेट नसते तर काय झाले असते?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.